असा. क्र. ११६ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शुक्रवार, डिसेंबर २९, २००६/पौष ८, शके १९२८

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग आठ

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of Article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Tax on Lotteries Act, 2006 (Mah. Act No. XLIII of 2006), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. M. SHINDEKAR,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. XLIII OF 2006.

*(First Published, after having received the assent of the Governor, in the "Maharashtra Government Gazette", on the 29th December 2006)*

An Act to provide for the levy and collection of tax on the lotteries and the matters connected therewith or incidental thereto.

WHEREAS it is expedient to enact a law to provide for the levy and collection of tax on the lotteries of the State as well as lotteries of other States, conducted as per the provisions of the Lotteries (Regulation) Act, 1998 and which are marketed in the State of Maharashtra, and for matters connected therewith or incidental thereto, for the purposes aforesaid; it is hereby enacted in the Fifty-seventh Year of the Republic of India as follows :—

17 of 1998.



[ किंमत : रुपये ९.०० ]

## CHAPTER I

### PRELIMINARY

Short title, extent and commencement.

1. (*1*) This Act may be called the Maharashtra Tax on Lotteries Act, 2006.

(*2*) It extends to the whole of the State of Maharashtra.

(*3*) It shall come into force on such date as the State Government may, by notification in the *Official Gazette*, appoint.

Definitions.

2. In this Act, unless the context otherwise requires,—

(*a*) " certifying authority " means the certifying authority appointed under sub-section (*3*) of section 6 ;

(*b*) " Commissioner " means the Commissioner, Small Savings and State Lotteries, Government of Maharashtra ;

(*c*) " Government " means the Government of Maharashtra ;

(*d*) " lottery " means a scheme, in whatever form and by whatever name called, for distribution of prizes by lot or chances to those persons participating in the chances of a prize by purchasing tickets, conducted as per the provisions of the Lotteries (Regulation) Act, 1998 ; 17 of 1998.

(*e*) " prescribed " means prescribed by rules made under this Act ;

(*f*) " Promoter " means the Government of any State or an Union Territory or any country organising, conducting or promoting a lottery and includes any person appointed as first importer for marketing lottery tickets in the State of Maharashtra on behalf of such Government or country where such Government or country is not directly marketing or conducting lottery schemes in the State ;

(*g*) " rules " means the rules made under this Act ;

(*h*) " sales " means sale of lottery tickets of the State or of any other State within the State for cash or deferred payment or any other valuable consideration ;

(*i*) " State " means the State of Maharashtra ;

(*j*) " tax " means the tax levied and collected on lotteries under this Act.

## CHAPTER II

### INCIDENCE AND LEVY OF TAX

Levy of tax on lottery schemes.

3. (*1*) There shall be levied and collected a tax on the lottery schemes specified in column (2) of the Table hereunder, at the rates

specified against them in column (3) of the said Table :—

TABLE

| No. (1) | Lottery schemes (2) | Rate of tax (3) |
|---|---|---|
| | | Rs. |
| 1 | Weekly lottery scheme ... | 50,000 |
| 2 | Fortnightly lottery scheme or any lottery scheme between week and fortnight | 1,00,000 |
| 3 | Monthly lottery scheme or any lottery scheme of any duration exceeding fortnight | 2,00,000 |
| 4 | Bumper lottery scheme ... | 10,00,000 |

(2) The tax levied under sub-section (*1*) shall be paid by the Promoter.

Payment of tax in advance.

**4.** (*1*) Every Promoter shall submit to the tax authorities the Statement containing all such particulars, within such time and in such format as may be prescribed, relating to the lottery schemes of which tickets are sold in the State.

(*2*) The Promoter shall pay at least one week in advance the amount of tax payable by him under this Act in respect of lottery schemes shown in the Statement referred to in sub-section (*1*) and the amount so payable shall, for the purpose of section 11, be deemed to be the amount payable under this Act from the Promoter.

## CHAPTER III

### TAX AUTHORITIES

Tax authorities.

**5.** (*1*) The Commissioner shall be responsible for carrying out the purposes of this Act.

(*2*) The State Government may appoint such number of other officers, staff, persons and give them such designations, as the Government deems necessary.

(*3*) The Commisssioner shall have jurisdiction over the whole of the State and other officers appointed under sub-section (*2*) shall have jurisdiction over the whole of the State or such area or areas, as the State Government may, by notification in the *Official Gazette*, specify.

(*4*) The Commissioner shall have and exercise all the powers and perform all the duties, conferred or imposed on him by or under this Act.

(*5*) Other officers, staff and persons shall, within their jurisdiction, exercise such powers and perform such duties of the Commissioner under this Act, as the Commissioner may, subject to such conditions and restrictions as he may, by general or special order impose, delegate to them, either generally or in respect of any particular matter or class of matters, by an order published in the *Official Gazette*.

(6) All officers, staff and persons appointed under sub-section (2), shall be subordinate to the Commissioner and subordination of officers other than the Commissioner and of staff and persons amongst themselves shall be such as may be prescribed.

(7) The Commissioner may, from time to time, issue such instructions and directions as he may deem fit to the officers subordinate to him for carrying out the purposes of this Act and officers shall observe and follow such instructions and directions of the Commissioner.

Powers of Commissioner.

6. (1) In discharging the functions by or under this Act, the Commissioner shall have all the powers of a Civil Court under the Code of Civil Procedure, 1908, for the following matters, namely :— 5 of 1908.

(a) receiving evidence on affidavit ;

(b) summoning and enforcing the attendance of any person and examining him on oath or affirmation ;

(c) compelling the production of document ; and

(d) issuing commission for the examination of witnesses.

(2) In the case of any affidavit to be made for the purposes of this Act, any officer appointed by the Commissioner may administer the oath to the deponent.

(3) The Commissioner shall appoint a certifying authority consisting of such officer or officers as deemed fit, who shall issue certificate of payment of tax to Promoters.

(4) The Promoter shall keep all accounts of the tax paid under this Act and submit the same to the certifying authority as may be prescribed.

## CHAPTER IV

### REGISTRATION

Registration and cancellation of certificate.

7. (1) Every Promoter liable to pay tax under section 3 shall obtain a certificate of registration.

(2) Every Promoter required to obtain a certificate of registration under sub-section (1) shall apply in such form, manner, time and to such authority, as may be prescribed. Such application shall be accompanied by the one-time prescribed fee.

(3) The prescribed authority shall, after scrutiny of the application and on being satisfied that, the application for registration is in order, shall issue the certificate of registration in the prescribed form.

(4) Where the prescribed authority has reason to believe that the Promoter to whom a certificate of registration has been issued, has contravened any provisions of this Act or of the rules or has discontinued the business, the prescribed authority may, after giving to the Promoter a reasonable opportunity of being heard, for reasons to be recorded in writing, by order, cancel the certificate of registration.

## CHAPTER V

### RETURNS

**8.** Every registered Promoter shall file a correct and duly complete monthly return in such form, by such date and to such authority, as may be prescribed. In addition to any data required for proper computation of tax, the return may provide for furnishing of data for purposes of collecting statistics or information relating to any matter dealt with by or in connection with this Act. Returns.

**9.** The amount of tax payable by the Promoter, for each financial year during which he is so liable, shall be assessed separately, in the manner prescribed, by the Assessing Officer appointed by the Commissioner. Assessment.

**10.** *(1)* If the Commissioner has reason to believe that any scheme has escaped assessment of tax or has been assessed at a rate lower than the rate at which it is assessable under this Act, the Commissioner may, notwithstanding anything contained in this Act, at any time, within a period of three years from the date of expiry of the end of the financial year in which the scheme has escaped assessment, or has been assessed at a lower rate than the rate at which it is assessable, proceed to assess or re-assess, to the best of his judgement, the tax payable by the Promoter in respect of such scheme, after following the prescribed procedure. Assessment of scheme escaping assessment.

*(2)* At the time of the assessment or re-assessment, as the case may be, under sub-section *(1)*, the Commissioner may, if he is satisfied that any scheme has been suppressed by the Promoter from assessment, he shall direct the Promoter to pay, in addition to the tax assessed under sub-section *(1)* a penalty equal to thrice the amount of tax so assessed, alongwith interest, after following the prescribed procedure.

**11.** The tax payable after assessment or re-assessment shall be paid as per the prescribed procedure. Payment of tax applicable after assessment or re-assessment.

**12.** *(1)* An appeal from every original order passed under this Act shall lie to the Commissioner and such appeal shall be filed within a period of sixty days from the date of communication of the order appealed against. Appeals.

*(2)* Subject to such rules of procedure as may be prescribed, the appellate authority shall have the following powers, namely :—

*(a)* in an appeal against an order of assessment, it may confirm, reduce, enhance or annul the assessment :

Provided that, appellate authority may set aside the assessment order and refer the case back to the assessing authority for making fresh assessment. The assessing authority shall thereupon proceed to make such assessment and determine, the amount of tax payable on the basis of such assessment ;

(*b*) in any other case, the appellate authority may pass such order in the appeal as it deems just and proper :

Provided that, the appellate authority shall not enhance an amount of tax assessed or reduces the amount of refund of the tax, unless the appellant has been given a reasonable opportunity of being heard.

(*3*) The appellate authority may, while admitting the appeal, stay the order appealed against in full or part, subject to such conditions or restrictions, as it may deem necessary including a direction for depositing of a part or whole of the disputed amount by the appellant.

Appeal to Government.

**13.** An appeal shall lie to the Government from every order passed by the Commissioner and such appeal shall be filed within one hundred and twenty days from the date on which the order appealed against is received by the assessee.

## CHAPTER VI

### PENALTY AND SEIZURE

Imposition of penalty in certain circumstances.

**14.** (*1*) Where any Promoter has not obtained a certificate of registration under section 7 or has not paid the tax of a particular scheme at least one week in advance as provided in section 4, the Government or any officer authorised by it, shall seize the tickets, the lottery terminals through which marketing of the tickets for that schemes are to take place and all types of servers, including the central server from which the lottery tickets are being generated.

(*2*) Where any Promoter fails to file return as required by section 8 or to pay tax for three lottery schemes which he is marketing in the State, the Commissioner may, after giving the Promoter a notice of not less than seven days, and after giving an opportunity of being heard by an order in writing, impose on him, in addition to the tax payable, a penalty of an amount equal to three times of the tax and shall seize all lottery tickets, lottery terminals and servers of the Promoter through which the lottery schemes are being operated or marketed.

(*3*) If it is noticed that the Promoter has concealed the particulars of any transaction or furnished inaccurate particulars of any transaction, the Commissioner shall, after giving the Promoter an opportunity of being heard, by an order in writing, impose, in addition to the tax payable on that transaction, a penalty of an amount equal to three times of the tax payable by him on that transaction.

Penalty.

**15.** Whoever,—

(*a*) wrongly represents a registered Promoter,

(*b*) furnishes false return,

(*c*) produces false document which will result in loss of Government revenue,

(*d*) keeps false accounts,

(*e*) furnishes false information,

(*f*) evades or attempts to evade any payment under this Act,

(*g*) fails to comply with any notice served on him under this Act, or

(*h*) voluntarily obstructs any officer making inspection, search or seizure under the provisions of this Act,

shall, on conviction, be punished with simple imprisonment for a term which may extend to six months.

Offences by companies.

**16.** (*1*) Where an offence under this Act has been committed by a company, every person who at the time the offence was committed, was in charge of, or was responsible to, the company for the conduct of the business of the company, as well as the company, shall be deemed to be guilty of the offence and shall be liable to be proceeded against and punished accordingly :

Provided that, nothing contained in this sub-section shall render any such person liable to any punishment under this Act, if he proves that the offence was committed without his knowledge and that he had exercised all due diligence to prevent the commission of such offence.

(2) Notwithstanding anything contained in sub-section (*1*), where an offence under this Act has been committed by the company and it is proved that the offence has been committed with the consent or connivance of, or is attributable to any neglect on the part of, any director, manager, secretary or other officer of the company such director, manager, secretary or other officer shall also be deemed to be guilty of that offence and shall be liable to be proceeded against and punished accordingly.

*Explanation.*—For the purposes of this section,—

(*a*) "company" means a body corporate and includes firm, association of persons or body of individuals whether incorporated or not ;

(*b*) " director ", in relation to firm, means a partner in the firm, and in relation to any association of persons or body of individuals, means any member controlling the affairs thereof.

Special mode of recovery.

**17.** (*1*) Notwithstanting anything contained in any other law, the Commissioner may, on noticing that there is an outstanding liability of tax, interest or penalty against a Promoter on whom a notice has already been served, at any time, by notice in writing, require,—

(*a*) any person from whom any amount of money is due or may become due, to the said Promoter, or

(*b*) any person who holds or may subsequently hold money for or on account of such Promoter,

to pay to the Commissioner either forthwith upon the money becoming due or being held or within the time specified in the notice, an amount equal to the amount due and outstanding from such Promoter as aforesaid with continuing interest till the date of payment :

Provided that, no action under this sub-section shall be taken till the date prescribed for filing of appeal against the order under which the amount has remained outstanding has expired.

(*2*) Any person making any payment in compliance with a notice under this section shall be deemed to have made the payment under the authority of the Promoter and the receipt of the Commissioner shall constitute a good and sufficient discharge of the liability of such person, to the extent of the amount referred to in the receipt.

## CHAPTER VII

### MISCELLANEOUS

Recovery of tax as arrears of the land revenue.

**18.** For the purpose of effecting recovery of the amount of tax, penalty, interest or any other sum due and recoverable from any Promoter by or under the provisions of this Act, the same shall be recovered as arrears of land revenue.

Compounding of offences.

**19.** (*1*) The Commissioner may, either before or after the institution of proceedings for any offence punishable under this Act accept from the person charged with such offence, by way of composition of an offence a sum not less than rupees one lakh.

(*2*) On payment of sum as provided in sub-section (*1*), no further proceedings shall be taken against the person charged with the offence and any proceedings, if already taken, shall stand abated.

Officers to be public servants.

**20.** All officers appointed under this Act shall be deemed to be public servants within the meaning of the Indian Penal Code. 45 of 1860.

Rectification of mistakes.

**21.** (*1*) The Commissioner may, at any time, within two years, from the date of an order passed by him, on his own motion, rectify any mistake apparent from the record, and shall within a like period rectify any such mistake which has been brought to his notice by any person affected by such order :

Provided that, no such rectification shall be made if it has the effect of enhancing the tax or penalty or interest or reducing the amount of a refund, unless the Commissioner has given notice in writing to such person of his intention to do so and has allowed such person a reasonable opportunity of being heard.

(*2*) The provisions of sub-section (*1*) shall apply to the rectification of a mistake by an appellate authority under section 12 as they apply to the rectification of a mistake by the Commissioner.

(3) Where any such rectification has the effect of reducing the amount of the tax or penalty or interest, the Commissioner shall refund any amount due to such person in the prescribed manner.

(4) Where any such rectification has the effect of enhancing the amount of the tax or penalty or interest or reducing the amount of refund, the Commissioner shall recover the amount due from such person in the prescribed manner.

Bom. XXXVI of 1959.

Fee on appeal and certain other applications.

**22.** Notwithstanding anything contained in the Bombay Court-fees Act, 1959,—

(*a*) any application not otherwise provided for when presented to a prescribed authority for a prescribed purpose or when presented to the Commissioner shall subject to the provisions of clause (*b*), be charged with such fee not exceeding one hundred rupees, as may be prescribed, and

(*b*) an appeal preferred under this Act shall bear a court fee stamp of such value, not exceeding one thousand rupees, if the amount in dispute exceeds rupees one lakh, and in any other case not exceeding one hundred rupees, as may be prescribed.

Protection of action taken under this Act.

**23.** No suit, prosecution or other legal proceedings shall lie against the authority or any officer of the Government for anything which is done or intended to be done in good faith in pursuance of the provisions of this Act or the rules made thereunder.

Power to make rules.

**24.** (*1*) The State Government may, by notification in the *Official Gazette*, make rules to carry out the purposes of this Act.

(2) Every rule made under this Act shall be laid as soon as may be, after it is made before each House of State Legislature, while it is in session for a total period of thirty days, which may be comprised in one session or in two or more successive sessions, and if, before the expiry of the session in which it is so laid or the session immediately following, both Houses agree in making any modification in rule or both Houses agree that the rule should not be made, and notify their decision to that effect in the *Official Gazette*, the rule shall, from the date of publication of such decision in the *Official Gazette*, have effect only in such modified form or be of no effect, as the case may be ; so, however, that any such modification or annulment shall be without prejudice to the validity of anything previously done or omitted to be done under that rule.

Power to remove difficulties.

**25.** (*1*) If any difficulty arises in giving effect to the provisions of this Act, the Government may, as occasion arises, by an order published in the *Official Gazette*, do anything, not inconsistent with the provisions of this Act, which appears to it to be necessary or expedient, for removing the difficulty :

Provided that, no such order shall be made after the expiry of a period of two years from the date of commencement of this Act.

(2) Every order made under this section shall be laid, as soon as may be, after it is made, before each House of the State Legislature.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

१९९८ चा १७. ज्याअर्थी, उपरोक्त प्रयोजनांसाठी, राज्याच्या लॉटऱ्यांवर, तसेच लॉटरी (विनियमन) अधिनियम, १९९८ याच्या तरतुदींनुसार चालविण्यात येणाऱ्या व महाराष्ट्र राज्यात खरेदी-विक्री करण्यात येणाऱ्या अन्य राज्यांच्या लॉटऱ्यांवर कर बसविण्यासाठी व तो गोळा करण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता कायदा अधिनियमित करणे इष्ट





आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सत्तावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

## प्रकरण एक

## प्रारंभिक

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. १. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र लॉटऱ्यांवरील कर अधिनियम, २००६ असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नेमून देईल अशा दिनांकास अंमलात येईल.

व्याख्या. २. या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) " प्रमाणन प्राधिकारी " याचा अर्थ, कलम ६ च्या, पोट-कलम (३) अन्वये नियुक्त केलेला प्रमाणन प्राधिकारी, असा आहे ;

(ख) " आयुक्त " याचा अर्थ, आयुक्त, अल्पबचत व राज्य लॉटरी, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(ग) " शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(घ) " लॉटरी " याचा अर्थ, लॉटरी (विनियमन) अधिनियम, १९९८ च्या तरतुदींअनुसार चालविण्यात येत असलेली, तिकिटे खरेदी करून बक्षीस मिळविण्याच्या संधीचा लाभ घेणाऱ्या व्यक्तींना चिठ्ठ्या टाकून (by lots) अथवा संभाव्यतेद्वारा बक्षिसांचे वितरण करण्यासाठी असलेली, कोणत्याही स्वरूपातील व कोणत्याही नावाने ओळखली जाणारी योजना, असा आहे ; १९९८ चा १७.

(ङ) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित, असा आहे ;

(च) " प्रवर्तक " याचा अर्थ, लॉटरी आयोजित करणारे, चालविणारे किंवा तिचे प्रवर्तन करणारे कोणत्याही राज्याचे वा संघ राज्यक्षेत्राचे अथवा कोणत्याही देशाचे सरकार, असा आहे आणि त्यामध्ये, जे सरकार किंवा जो देश महाराष्ट्र राज्यात लॉटरीच्या योजनांची थेट खरेदी-विक्री करत नसेल किंवा ती चालवीत नसेल त्या सरकारने किंवा देशाने त्याच्या वतीने महाराष्ट्र राज्यात लॉटरीच्या तिकिटांची खरेदी-विक्री करण्याकरिता राज्यातील पहिला आयातक म्हणून ज्या व्यक्तीची नियुक्ती केली असेल त्या व्यक्तीचाही समावेश होतो ;

(छ) " नियम " याचा अर्थ, या अधिनियमान्वये करण्यात आलेले नियम, असा आहे ;

(ज) " विक्री " याचा अर्थ, राज्याच्या किंवा इतर कोणत्याही राज्याच्या लॉटरी तिकिटांची राज्यात रोखीने किंवा विलंबित प्रदानाने किंवा इतर कोणत्याही किंमती मोबदल्याने, विक्री करणे, असा आहे ;

(झ) " राज्य " याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य, असा आहे ;

(ञ) " कर " याचा अर्थ, या अधिनियमान्वये, लॉटऱ्यांवर बसवण्यात येणारा व गोळा करण्यात येणारा कर, असा आहे.

## प्रकरण दोन

## कराचा भार व कर बसवणे

३. (१) खाली दिलेल्या तक्त्याच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या लॉटरी योजनांवर, उक्त तक्त्याच्या स्तंभ (३) मध्ये त्यांच्यासमोर विनिर्दिष्ट केलेल्या दराने कर बसविण्यात येईल व गोळा करण्यात येईल :— लॉटरी योजनांवर कर बसविणे.

तक्ता

| क्रमांक (१) | लॉटरी योजना (२) | कराचा दर (३) |
|---|---|---|
| | | रुपये |
| १ | साप्ताहिक लॉटरी योजना .. .. | ५०,००० |
| २ | पाक्षिक लॉटरी योजना किंवा सप्ताह व पंधरवडा यांच्यामध्ये होणारी कोणतीही लॉटरी योजना. | १,००,००० |
| ३ | मासिक लॉटरी योजना किंवा पंधरवड्याहून अधिक असणाऱ्या कोणत्याही कालावधीची कोणतीही लॉटरी योजना. | २,००,००० |
| ४ | भव्यतम (बंपर) लॉटरी योजना .. .. | १०,००,००० |

(२) पोट-कलम (१) अन्वये बसवलेला कर प्रवर्तकाकडून भरण्यात येईल.

४. (१) प्रत्येक प्रवर्तक, ज्या लॉटरी योजनांची तिकिटे राज्यात विकलेली आहेत अशा लॉटरी योजनांच्या संबंधात व विहित करण्यात येतील असे सर्व तपशील अंतर्भूत असलेले विवरणपत्र विहित करण्यात येईल अशा वेळेत आणि अशा नमुन्यात कर प्राधिकाऱ्यांकडे सादर करील. कर आगाऊ भरणे.

(२) प्रवर्तक, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या विवरणपत्रामध्ये दर्शविण्यात आलेल्या लॉटरी योजनांच्या बाबतीत, या अधिनियमान्वये त्याच्याकडून देय असलेली कराची रक्कम किमान एक आठवडा आगाऊ भरील आणि अशी देय रक्कम ही, कलम ११ च्या प्रयोजनासाठी, प्रवर्तकाकडून या अधिनियमान्वये देय असलेली रक्कम मानण्यात येईल.

## प्रकरण तीन

## कर प्राधिकारी

५. (१) आयुक्त, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यास जबाबदार असेल. कर प्राधिकारी.

(२) राज्य शासनास, त्याला आवश्यक वाटतील तितके इतर अधिकारी, कर्मचारीवर्ग, व्यक्ती यांची नियुक्ती करता येईल आणि त्यांना, शासनास आवश्यक वाटतील अशी पदनामे देता येतील.

(३) आयुक्तास संपूर्ण राज्यभर अधिकारिता असेल आणि पोट-कलम (२) अन्वये नियुक्त केलेल्या इतर अधिकाऱ्यांना, संपूर्ण राज्यभर किंवा राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, विनिर्दिष्ट करील अशा क्षेत्रामध्ये किंवा क्षेत्रांमध्ये, अधिकारिता असेल.

(४) आयुक्तास, या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये त्यास प्रदान केलेले सर्व अधिकार असतील आणि तो त्यांचा वापर करील आणि त्याद्वारे किंवा तदन्वये त्याच्याकडे सोपविण्यात आलेली सर्व कर्तव्ये तो पार पाडील.

(५) आयुक्त सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे लादेल अशा शर्ती व निर्बंध यांना अधीन राहून, इतर अधिकारी, कर्मचारीवर्ग आणि व्यक्ती हे, आपापल्या अधिकारितेत, आयुक्ताचे या अधिनियमाखालील जे अधिकार व जी कर्तव्ये तो, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, सर्वसाधारणपणे अथवा कोणत्याही विशिष्ट बाबीच्या किंवा बाबींच्या संबंधात, त्यांच्याकडे सोपवील, अशा अधिकारांचा वापर करतील आणि अशी कर्तव्ये पार पाडतील.

(६) पोट-कलम (२) अन्वये नियुक्त केलेले सर्व अधिकारी, कर्मचारीवर्ग आणि व्यक्ती या, आयुक्ताला दुय्यम असतील आणि आयुक्ताव्यतिरिक्त अन्य अधिकारी आणि कर्मचारीवर्ग आणि व्यक्ती यांची आपापसातली दुय्यमता, विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

(७) या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, आयुक्तास, त्याला दुय्यम असणाऱ्या अधिकाऱ्यांना, वेळोवेळी, त्याला योग्य वाटतील अशा सूचना आणि निदेश देता येतील आणि ते अधिकारी, आयुक्ताच्या अशा सूचनांचे आणि निदेशांचे पालन व अनुसरण करतील.

आयुक्ताचे अधिकार.

**६.** (१) आयुक्ताला, या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये त्याची कार्ये पार पाडत असताना, पुढील बाबतीत दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये दिवाणी न्यायालयास असलेले सर्व अधिकार असतील :— (१९०८ चा ५.)

(क) शपथपत्रावर पुरावा स्वीकारणे ;

(ख) कोणत्याही व्यक्तीला हजर राहण्याबाबत समन्स पाठवणे व तिला हजर होण्यास भाग पाडणे आणि तिची शपथेवर किंवा प्रतिज्ञेवर तपासणी करणे ;

(ग) दस्तऐवज सादर करण्यास भाग पाडणे ; आणि

(घ) साक्षीदारांची तपासणी करण्यासाठी आयोगपत्रे काढणे.

(२) या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी करावयाच्या कोणत्याही शपथपत्राच्या बाबतीत, आयुक्ताने नियुक्त केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याला, जबानी देणाऱ्या व्यक्तीस शपथ देता येईल.

(३) आयुक्त, त्याला योग्य वाटेल अशा एका किंवा त्याहून अधिक अधिकाऱ्यांचा समावेश असलेल्या प्रमाणन प्राधिकरणाची नियुक्ती करील आणि ते प्राधिकरण प्रवर्तकांना कर भरल्याचे प्रमाणपत्र देईल.

(४) प्रवर्तक, या अधिनियमान्वये दिलेल्या कराचे सर्व हिशेब ठेवील आणि विहित करण्यात येईल त्याप्रमाणे, ते हिशेब, प्रमाणन प्राधिकाऱ्याला सादर करील.

प्रकरण चार

## नोंदणी

७. (१) कलम ३ अन्वये कर भरण्यास पात्र असणारा प्रत्येक प्रवर्तक नोंदणी प्रमाणपत्र मिळवील. नोंदणी प्रमाणपत्र देणे आणि ते रद्द करणे.

(२) पोट-कलम (१) अन्वये नोंदणी प्रमाणपत्र मिळविणे आवश्यक असेल असा प्रत्येक प्रवर्तक, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात, अशा रीतीने, अशा कालावधीत आणि अशा प्राधिकाऱ्याकडे अर्ज करील. अशा अर्जासोबत विहित केलेली एकरकमी फी भरण्यात येईल.

(३) विहित प्राधिकारी, अर्जाची छाननी केल्यानंतर आणि नोंदणीसाठीचा अर्ज नियमानुसार आहे अशी त्याची खात्री झाल्यावर, विहित केलेल्या नमुन्यात नोंदणी प्रमाणपत्र देईल.

(४) ज्या प्रवर्तकास नोंदणी प्रमाणपत्र देण्यात आले आहे त्याने, या अधिनियमाच्या किंवा नियमांच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन केले आहे किंवा व्यवसाय बंद केला आहे असे विहित प्राधिकाऱ्याला सकारण वाटत असेल तर त्या विहित प्राधिकाऱ्यास, प्रवर्तकाला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, आदेशाद्वारे, कारणे लेखी नमूद करून, नोंदणी प्रमाणपत्र रद्द करता येईल.

प्रकरण पाच

## विवरणे

८. प्रत्येक नोंदणीकृत प्रवर्तक, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात, अशा दिनांकास व अशा प्राधिकाऱ्याकडे, अचूक व यथोचितरीत्या पूर्ण भरलेले मासिक विवरण दाखल करील. करांची योग्य प्रकारे गणना करण्यासाठी आवश्यक असलेल्या कोणत्याही माहितीव्यतिरिक्त, या विवरणात, या अधिनियमाद्वारे हाताळण्यात येणाऱ्या किंवा त्याच्याशी संबंधित असणाऱ्या कोणत्याही बाबीसंबंधातील आकडेवारी किंवा माहिती गोळा करण्याच्या प्रयोजनासाठी माहिती सादर करण्यासंबंधी तरतूद करता येईल. विवरणे.

९. ज्या वित्तीय वर्षामध्ये प्रवर्तक कर भरण्यास पात्र असेल अशा प्रत्येक वित्तीय वर्षासाठी प्रवर्तकाकडून देय असलेली कराची रक्कम, आयुक्ताने नियुक्त केलेल्या अशा निर्धारण अधिकाऱ्याकडून, विहित केलेल्या रीतीने स्वतंत्रपणे निर्धारित करण्यात येईल. निर्धारण.

१०. (१) कोणत्याही योजनेचे निर्धारण राहून गेले आहे किंवा या अधिनियमान्वये ज्या दराने योजना निर्धारणयोग्य असेल त्यापेक्षा कमी दराने तिचे निर्धारण करण्यात आले आहे असे आयुक्तास सकारण वाटत असेल तर, आयुक्तास, या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या वर्षात योजनेचे निर्धारण राहून गेले आहे किंवा योजना निर्धारणयोग्य असेल त्यापेक्षा कमी दराने तिचे निर्धारण करण्यात आले आहे, त्या वित्तीय वर्षाच्या समाप्तीच्या दिनांकापासून तीन वर्षांच्या कालावधीत, कोणत्याही वेळी, विहित केलेली कार्यपद्धती अनुसरल्यानंतर, अशा योजनेच्या संबंधात प्रवर्तकाकडून देय असलेल्या कराचे, आपल्या संपूर्ण निर्णयशक्तीनुसार निर्धारण किंवा पुनर्निर्धारण करण्याची कार्यवाही करता येईल. निर्धारण करण्याचे राहून गेलेल्या योजनेचे निर्धारण.

(२) पोट-कलम (१) अन्वये, निर्धारण किंवा, यथास्थिति, पुनर्निर्धारण करतेवेळी, प्रवर्तकाने कर निर्धारणापासून कोणतीही योजना लपवून ठेवली आहे अशी आयुक्ताची खात्री पटली तर, तो, विहित कार्यपद्धती अनुसरून त्यानंतर, त्या प्रवर्तकास, वरील पोट-कलम (१) अन्वये निर्धारित केलेल्या कराव्यतिरिक्त, अशा प्रकारे निर्धारित केलेल्या कराच्या रकमेच्या तिप्पट असेल इतक्या रकमेची शास्ती व्याजासह देण्याचे निदेश देईल.

निर्धारण किंवा पुनर्निर्धारण केल्यानंतर लागू झालेल्या कराचा भरणा.

११. निर्धारण किंवा पुनर्निर्धारण केल्यानंतर देय असलेला कर, विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार भरण्यात येईल.

अपिले.

१२. (१) या अधिनियमान्वये काढलेल्या प्रत्येक मूळ आदेशाविरुद्ध आयुक्ताकडे अपील करता येईल आणि ज्या आदेशाविरुद्ध अपील करावयाचे तो आदेश कळविल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत, असे अपील दाखल करण्यात येईल.

(२) कार्यपद्धतीसंबंधात विहित करण्यात येतील अशा नियमांना अधीन राहून, अपील प्राधिकरणाला पुढील अधिकार असतील :---

(क) निर्धारण आदेशाविरुद्धच्या अपिलात त्याला ते करनिर्धारण कायम करता येईल, कमी करता येईल, वाढविता येईल किंवा रद्द करता येईल :

परंतु, अपील प्राधिकरणाला, निर्धारण आदेश रद्द करता येईल आणि नव्याने निर्धारण करण्याकरिता ते प्रकरण निर्धारण प्राधिकाऱ्याकडे परत पाठवता येईल. त्यानंतर, निर्धारण प्राधिकारी असे निर्धारण करण्याची कार्यवाही सुरू करील आणि अशा निर्धारणाच्या आधारे देय कराची रक्कम निश्चित करील ;

(ख) अन्य कोणत्याही बाबतीत, अपील प्राधिकरणास, त्या अपिलावर त्याला न्याय्य व उचित वाटेल असा आदेश काढता येईल :

परंतु, अपील प्राधिकरण, अर्जदारास आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज, निर्धारित कराची रक्कम वाढविणार नाही किंवा कराच्या परताव्याची रक्कम कमी करणार नाही.

(३) अपील प्राधिकरणास, अपील दाखल करून घेताना, ज्याविरुद्ध अपील करण्यात आले आहे अशा आदेशास, आवश्यक वाटतील अशा शर्तींना किंवा निर्बंधांना अधीन राहून, पूर्णतः किंवा अंशतः स्थगिती देता येईल ; तसेच अर्जदारास विवादग्रस्त रक्कम अंशतः किंवा पूर्णतः भरण्याचा निदेश देखील देता येईल.

शासनाकडे अपील करणे.

१३. आयुक्ताने काढलेल्या प्रत्येक आदेशाविरुद्ध शासनाकडे अपील करता येईल आणि ज्या आदेशाविरुद्ध अपील करावयाचे तो आदेश करपात्र व्यक्तीस ज्या दिनांकास मिळाला असेल त्या दिनांकापासून एकशेवीस दिवसांच्या कालावधीत ते दाखल करण्यात येईल.

## प्रकरण सहा

## शास्ती व जप्ती

विवक्षित परिस्थितीत शास्ती लादणे.

१४. (१) कोणत्याही प्रवर्तकाने कलम ७ अन्वये नोंदणी प्रमाणपत्र मिळविलेले नसेल किंवा कलम ४ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, त्याने, एखाद्या विशिष्ट योजनेचा कर, किमान एक आठवडा अगोदर भरलेला नसेल तर, शासन, किंवा शासनाने प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी, त्या योजनांची तिकिटे, त्या तिकिटांची खरेदी-विक्री ज्या लॉटरी केंद्रांमधून (terminals) करण्यात येणार असेल ती केंद्रे आणि ज्या मुख्य सर्व्हरमधून लॉटरीची तिकिटे काढण्यात येत असतील त्या मुख्य सर्व्हरसह सर्व प्रकारचे सर्व्हर जप्त करील.

(२) कोणत्याही प्रवर्तकाने, कलम ८ द्वारे आवश्यक असलेले विवरण दाखल करण्यात कसूर केली असेल किंवा ज्या लॉटरी योजनांच्या तिकिटांची तो राज्यात खरेदी-विक्री करीत असेल अशा तीन लॉटरी योजनांसाठीचा कर त्याने भरला नसेल तर, आयुक्त, प्रवर्तकाला सात दिवसांपेक्षा कमी नसेल इतक्या दिवसांची नोटीस दिल्यावर आणि त्याला त्याचे म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, लेखी आदेशाद्वारे, या देय कराव्यतिरिक्त, त्याने भरावयाच्या कराच्या रकमेच्या तिप्पट रकमेएवढी शास्ती त्याच्यावर लादील आणि सर्व लॉटरी तिकिटे व प्रवर्तक ज्यांच्यामार्फत लॉटरी योजना चालवीत असेल किंवा त्यांची खरेदी-विक्री करीत असेल अशी लॉटरी केंद्रे व सर्व्हर जप्त करील.

(३) प्रवर्तकाने कोणत्याही व्यवहाराचा तपशील लपविलेला आहे किंवा त्याने कोणत्याही व्यवहाराचा चुकीचा तपशील दिलेला आहे असे निदर्शनास आले तर, आयुक्त, त्या प्रवर्तकास आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, लेखी आदेशाद्वारे, त्या व्यवहारावर देय असलेल्या कराव्यतिरिक्त, त्याच्याकडून त्या व्यवहारावर देय असलेल्या कराच्या रकमेच्या तिप्पट रकमेएवढी शास्ती लादील.

१५. जी कोणतीही व्यक्ती,— शास्ती.

(क) नोंदणीकृत प्रवर्तक असल्याचे भासवत असेल,

(ख) खोटे विवरणपत्र सादर करीत असेल,

(ग) ज्यामुळे शासनाचा महसूल बुडेल, अशी कोणतीही खोटी कागदपत्रे सादर करीत असेल,

(घ) खोटे लेखे ठेवत असेल,

(ङ) खोटी माहिती देत असेल,

(च) या अधिनियमाखालील कोणतीही रक्कम भरण्यास टाळाटाळ करीत असेल, किंवा टाळाटाळ करण्याचा प्रयत्न करीत असेल,

(छ) या अधिनियमान्वये त्याच्यावर बजावण्यात आलेल्या कोणत्याही नोटिशीचे अनुपालन करण्यात कसूर करीत असेल, किंवा

(ज) या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये तपासणी करणाऱ्या, झडती घेणाऱ्या किंवा जप्ती आणणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्यास हेतुपुरस्सर अटकाव करीत असेल,

तर, तिला, दोष सिद्ध झाल्यानंतर, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या साध्या कारावासाची शिक्षा करण्यात येईल.

१६. (१) या अधिनियमाखालील अपराध एखाद्या कंपनीने केला असेल त्या बाबतीत, असा अपराध घडला त्यावेळी जिच्याकडे कंपनीचा प्रभार होता किंवा जी कंपनीचे कामकाज चालविण्यास कंपनीस जबाबदार होती अशी प्रत्येक व्यक्ती, तसेच ती कंपनीदेखील, अशा अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानले जाईल आणि तिच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व त्यानुसार शिक्षा दिली जाण्यास ती पात्र असेल : कंपन्यांनी केलेले अपराध.

परंतु, अशा कोणत्याही व्यक्तीने, असा अपराध तिच्या नकळत घडला आणि असा अपराध घडू नये म्हणून तिने सर्वतोपरी प्रयत्न केले होते असे सिद्ध केल्यास, या पोट-कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे अशी व्यक्ती या अधिनियमान्वये कोणत्याही शिक्षेस पात्र होणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा या अधिनियमाखालील एखादा अपराध एखाद्या कंपनीने केला असेल आणि तो अपराध कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा इतर अधिकारी यांच्या संमतीने किंवा त्याने कानाडोळा केल्यामुळे किंवा दुर्लक्ष केल्यामुळे घडला आहे असे सिद्ध झाले तर, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा इतर अधिकारीदेखील त्या अपराधाबद्दल दोषी आहे असे मानण्यात येईल व त्याच्याविरुद्ध कारवाई केली जाण्यास व त्यानुसार शिक्षा दिली जाण्यास पात्र ठरेल.

**स्पष्टीकरण.—** या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क) " कंपनी " याचा अर्थ, निगम निकाय असा आहे व त्यात भागीदारी संस्थेचा, व्यक्तींच्या संघाचा अथवा व्यक्तींच्या संस्थेचा—मग ती विधिसंस्थापित असो वा नसो—समावेश होतो ;

(ख) भागीदारी संस्थेच्या संदर्भात " संचालक " याचा अर्थ, त्या भागीदारी संस्थेतील भागीदार, असा आहे आणि व्यक्तींचा संघ किंवा व्यक्तींची संस्था यांच्या संदर्भात " संचालक " याचा अर्थ, तिच्या कामकाजाचे नियंत्रण करणारा कोणताही सदस्य, असा आहे.

वसुलीची विशेष पद्धत.

१७. (१) अन्य कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, ज्याच्यावर आधीच नोटीस बजावलेली आहे अशा एखाद्या प्रवर्तकाकडे कर, व्याज किंवा शास्ती यांची थकबाकी आहे असे जर आयुक्ताच्या निदर्शनास आले तर, त्याला, कोणत्याही वेळी, लेखी नोटिशीद्वारे,—

(क) उक्त प्रवर्तकास ज्या कोणत्याही व्यक्तीकडून कोणतीही रक्कम देय असेल किंवा देय होईल त्या व्यक्तीस, किंवा

(ख) जी कोणतीही व्यक्ती, अशा प्रवर्तकासाठी किंवा त्याच्या वतीने रक्कम ताब्यात ठेवत असेल किंवा नंतर ताब्यात ठेवणार असेल त्या व्यक्तीस,

तिच्याकडून रक्कम देय झाल्यावर किंवा तिने रक्कम ताब्यात घेतल्यावर ताबडतोब किंवा नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीच्या आत, उपरोक्तप्रमाणे अशा प्रवर्तकाकडून येणे असलेल्या आणि अदत्त असलेल्या रकमेइतकी रक्कम आयुक्ताकडे भरण्यास फर्माविता येईल :

परंतु, ज्या आदेशाखालील रक्कम अदत्त राहिलेली असेल त्या आदेशाविरुद्ध अपील दाखल करण्यासाठी विहित केलेला दिनांक समाप्त होईपर्यंत या पोट-कलमान्वये कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही.

(२) या कलमाखालील नोटिशीचे अनुपालन करून कोणतीही रक्कम भरणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने, प्रवर्तकाच्या प्राधिकारात अशी रक्कम भरली आहे असे मानले जाईल, आणि आयुक्ताच्या पावतीवरून, तीत उल्लेखलेल्या रकमेच्या मर्यादेपर्यंत अशा व्यक्तीने आपले दायित्व योग्य आणि पुरेशा रीतीने पार पाडल्याचे प्रस्थापित होईल.

## प्रकरण सात

### संकीर्ण

१८. या अधिनियमाच्या तरतुदींद्वारे किंवा तदन्वये कोणत्याही प्रवर्तकाकडून देय असलेली व वसुलीयोग्य असलेली कर, शास्ती, व्याज यांची किंवा अन्य कोणतीही रक्कम वसूल करण्याच्या प्रयोजनार्थ, ती रक्कम जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करण्यात येईल. जमीन महसुलाच्या थकबाकी-प्रमाणे कराची वसुली.

१९. (१) आयुक्तास, या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधासाठीची कार्यवाही दाखल करण्यापूर्वी किंवा त्यानंतर, जिच्यावर त्या अपराधाबाबत दोषारोप करण्यात आला असेल त्या व्यक्तीकडून, अपराधाबाबत आपसमेळ म्हणून एक लाख रुपयांपेक्षा कमी नसेल एवढी रक्कम स्वीकारता येईल. अपराध आपसात मिटविणे.

(२) पोट-कलम (१) अन्वये तरतूद करण्यात आल्याप्रमाणे, अशा रकमेचा भरणा केल्यावर, असा दोषारोप करण्यात आलेल्या त्या व्यक्तीविरुद्ध त्यापुढे कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही आणि जर कोणतीही कार्यवाही अगोदरच करण्यात आली असेल तर ती समाप्त होईल.

१८६० चा ४५. २०. या अधिनियमान्वये नियुक्त करण्यात आलेले सर्व अधिकारी, भारतीय दंड संहितेच्या अर्थांतर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल. अधिकारी लोकसेवक असणे.

२१. (१) आयुक्तास, अभिलेखामध्ये उघड उघड दिसून येणारी कोणतीही चूक, त्याने काढलेल्या आदेशाच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या आत केव्हाही, स्वतः होऊन दुरुस्त करता येईल, आणि अशा आदेशामुळे बाधा पोहोचलेल्या कोणत्याही व्यक्तीने त्याच्या निदर्शनास आणून दिलेली कोणतीही चूक, तो, तेवढ्याच कालावधीमध्ये दुरुस्त करील : चुकांची दुरुस्ती.

परंतु, जर अशा दुरुस्तीमुळे कर वा शास्ती वा व्याज यांच्या रकमेत वाढ होणार असेल किंवा परताव्याची रक्कम कमी होणार असेल तर, आयुक्ताने, असे करण्याचा आपला उद्देश असल्याबाबत अशा व्यक्तीला लेखी नोटीस दिली असल्याखेरीज आणि अशा व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिली असल्याखेरीज, अशी कोणतीही दुरुस्ती करण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) च्या तरतुदी, आयुक्ताने केलेल्या चूकदुरुस्तीला जशा लागू होतात त्याप्रमाणे त्या कलम १२ खालील, अपील प्राधिकरणाने केलेल्या चूकदुरुस्तीला लागू होतील.

(३) जेव्हा अशा कोणत्याही दुरुस्तीमुळे कराची किंवा शास्तीची किंवा व्याजाची रक्कम कमी होत असेल तेव्हा, आयुक्त, अशा व्यक्तीला देय असलेली कोणतीही रक्कम, विहित रीतीने परत करील.

(४) जेव्हा अशा कोणत्याही दुरुस्तीमुळे कराची किंवा शास्तीची किंवा व्याजाची रक्कम वाढत असेल अथवा परताव्याची रक्कम कमी होत असेल तेव्हा, आयुक्त, अशा व्यक्तीकडून देय असलेली रक्कम, विहित रीतीने वसूल करील.

अपील आणि इतर विवक्षित अर्जासाठी फी.

२२. मुंबई न्यायालय-फी अधिनियम, १९५९ यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,— १९५९ चा मुंबई ३६.

(क) ज्यासाठी अन्यथा तरतूद केलेली नाही असा कोणताही अर्ज, एखाद्या विहित प्राधिकाऱ्याकडे, एखाद्या विहित प्रयोजनासाठी सादर करण्यात येईल किंवा आयुक्ताकडे सादर करण्यात येईल तेव्हा त्यासाठी, खंड (ख) च्या तरतुदींना अधीन राहून, विहित करण्यात येईल त्याप्रमाणे, शंभर रुपयांपेक्षा अधिक नसेल एवढी फी आकारण्यात येईल ; आणि

(ख) या अधिनियमाखाली दाखल केलेल्या अपिलासाठी, विहित करण्यात येईल त्याप्रमाणे, जर विवादास्पद रक्कम एक लाख रुपयांपेक्षा अधिक असेल तर, एक हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल एवढ्या किंमतीचा न्यायालय फी मुद्रांक लावावा लागेल, आणि अन्य कोणत्याही अपिलासाठी, शंभर रुपयांपेक्षा अधिक नसेल एवढ्या किंमतीचा न्यायालय-फी मुद्रांक लावावा लागेल.

या अधिनियमान्वये केलेल्या कृतीस संरक्षण.

२३. या अधिनियमाच्या तरतुदींअनुसार किंवा त्याखाली केलेल्या नियमांनुसार सद्भावनेने केलेल्या किंवा करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही गोष्टीसाठी, शासनाच्या कोणत्याही प्राधिकाऱ्याविरुद्ध किंवा कोणत्याही अधिकाऱ्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

नियम करण्याचा अधिकार.

२४. (१) राज्य शासनाला, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(२) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन वा त्याहून अधिक अधिवेशनांत मिळून, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांपुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांची सहमती झाली किंवा तो नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहांची सहमती झाली व त्यांनी त्यांचा तशा आशयाचा निर्णय **राजपत्रात** अधिसूचित केला तर, तो निर्णय **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून, तो नियम, अशा फेरबदल केलेल्या स्वरूपात अंमलात येईल किंवा यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही ; तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा विलोपनामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

२५. (१) या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्भवल्यास, शासनास, प्रसंगानुरूप, अशी अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांकरिता, त्याला आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसेल अशी कोणतीही गोष्ट **राजपत्रात** आदेश प्रसिद्ध करून करता येईल : अडचणी दूर करण्याचा अधिकार.

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) या कलमान्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर ठेवण्यात येईल.